Maharashtra State Board of
Secondary & Higher
Secondary Education
Kolhapur Divisional Board
Kolhapur-416004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर - ४१६ ००४

Ph No. 0231-2696101/2/3 WebSite : www.sscboardkolhapur.in Email: divsec.kop@gmail.com

क्र.कोविमं/माउमागोप/व्हिर्स्प/2025/4399
दिनांक : 11/12/2025

प्रति,

प्राचार्य/मुख्याध्यापक
माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा
सातारा/सांगली/कोल्हापूर/रत्नागिरी/सिंधुदुर्ग

**विषय** : **माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र ( फेब्रुवारी-मार्च 2026 ) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा ( फेब्रुवारी-मार्च 2026 ) संदर्भात विदयार्थ्यांच्या शैक्षणिक मार्गदर्शनासाठी महत्वाच्या विषयांचे शिक्षकांसाठी व्हिडिओ निर्मिती स्पर्धेचे आयोजन** .........

***स्पर्धेचा विषय : बोर्ड परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे अचूकपणे लेखन कसे कराल ?***

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास व आपल्या माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविदयालयातील सर्व कार्यरत सहशिक्षकांना कळविण्यात येते की, कोल्हापूर व कोकण विभागीय मंडळाने **बोर्ड परीक्षेचा राजमार्ग** या कृतीकार्यक्रमाचा एक भाग म्हणून माध्यमिक शालान्त व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी-मार्च 2026 च्या विदयार्थ्यांना गुणवत्तापूर्वक, अध्यापनपूरक व्हिडिओव्दारे मार्गदर्शन उपलब्ध होवून त्यांना प्रोत्साहित करणे, अभ्यासाची आवड निर्माण होणे, परीक्षेला आत्मविश्वासाने सामोरे जाण्यासाठी व **उत्तरपत्रिकामधील अचूक लेखनाचे कौशल्य विकसित करण्यासाठी** आपल्या शाळा व कनिष्ठ महाविदयालयातील विषय शिक्षकांकडून विषयनिहाय शैक्षणिक मार्गदर्शक व्हिडिओ तयार करावयाचे आहेत.

आजच्या आधुनिक युगात अध्ययन-अध्यापनासाठी सर्वत्र तंत्रज्ञानाचा वापर होत आहे. सध्या युटयूब-डिजिटल आधारित शिक्षण आत्मसात करण्याकडे कल वाढला असून, शिक्षण प्रक्रियेस पुरक असे मार्गदर्शक व्हिडिओ उपलब्ध असणे ही अत्यावश्यक शैक्षणिक गरज बनली आहे. हीच पार्श्वभूमी लक्षात घेवून विभागीय मंडळाने काही महत्वाच्या विषयांचे साधारणपणे 07 ते 10 मिनीटांचे शिक्षकांकडून व्हिडिओ तयार करुन ते युटयूबवर, मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्याचे निश्चित केले असून त्यासाठी शिक्षकांसाठी दर्जेदार व्हिडिओ निर्मितीची खुली स्पर्धा आयोजित करण्यात येत आहे.

**इयत्ता 12 वी स्पर्धेसाठी खालीलप्रमाणे शाखानिहाय विषयांचे व्हिडिओ तयार करावयाचे आहेत.**

**कला शाखा** : 1.इतिहास 2.भूगोल 3.राज्यशास्त्र 4. समाजशास्त्र 5. अर्थशास्त्र
**वाणिज्य शाखा** : 1.पुस्तकपालन व लेखाकर्म 2. वाणिज्य संघटन 3. चिटणासाची कार्यपध्दती 4.सहकार
**शास्त्र शाखा** : 1.गणित व संख्याशास्त्र 2. भौतिकशास्त्र 3. रसायनशास्त्र 4. जीवशास्त्र

**सर्व शाखांसाठी मराठी , इंग्रजी व हिंदी**

## इयत्ता 10 वी स्पर्धेसाठी खालील विषयाचे व्हिडीओ तयार करावयाचे आहेत.

**1.मराठी प्रथम भाषा 2. हिंदी व्दितीय व.तृतीय भाषा 3. इंग्रजी व्दितीय व.तृतीय भाषा 4. बीजगणित 5.भूमिती 6. विज्ञान भाग-1 7. विज्ञान भाग - 2 8. इतिहास 9.भूगोल**

### स्पर्धेसाठी आवश्यक माहिती व अटी :

1. सदरची स्पर्धा ही कोल्हापूर व कोकण विभागीय मंडळाने संयुक्त विद्‌यमानाने आयोजित केली आहे. सदर स्पर्धेसाठी कार्यक्षेत्रातील सातारा/सांगली/कोल्हापूर/रत्नागिरी/सिंधुदुर्ग जिल्हयातील कोणत्याही माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापक, कनिष्ठ महाविदयालयाचे प्राचार्य किंवा त्यांचे विषय शिक्षक सहभाग घेवू शकतात.
2. शिक्षकांनी स्वत: व्हिडिओ तयार करणे आवश्यक आहे. तांत्रिक सहाय्यकांची मदत ते घेऊ शकतात.
3. व्हिडिओ हा विदयार्थ्यांना आकलन होण्यास सुसहाय्य होईल अशा भाषेत रेकॉर्ड होणे आवश्यक आहे.
4. व्हिडिओ तयार करताना विदयार्थ्यांच्या वयोगटाचा विचार होणे आवश्यक आहे.
5. व्हिडिओमध्ये विषयाचा आशय, विदयार्थ्याना प्रोत्साहन, विषयाबाबत वाटणारी भिती, उत्तरपत्रिका सोडवताना घ्यावयाची काळजी, प्रश्ननिहाय भारांश, उत्तरलेखन पध्दती, गुणांकन निकष, वेळेचे नियोजन इत्यादी बाबींचा समावेश असावा.
6. आवाजात सुस्पष्टता असावी. आवाजाची/बोलण्याची गती यामध्ये समन्वय असावा, व्हिडिओमध्ये इतर आवाज रेकॉर्ड होणार नाही याची काळजी घ्यावी.
7. व्हिडिओ कॉपीराईट नसावा.
8. व्हिडीओच्या सुरवातीला स्वत:चा संक्षिप्त परिचय तोंडी सांगू नये, त्याबाबतचा तपशील सोबतच्या नमुन्याप्रमाणे (टेम्प्लेट) Display करावा.
9. व्हिडिओची लांबी 07 ते 10 मिनिटाची असावी.
10. व्हिडिओ मध्ये व्यावसायिक जाहिरात किंवा खाजगी शैक्षणिक प्रकाशकांची/साधनांची जाहिरात नसावी.
11. व्हिडिओमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केल्यास उत्तम.
12. व्हिडिओ फॉरमॅट MP4 असावा.
13. व्हिडिओ मधील मजकूर व आशयाबाबत पूर्णत: संबंधित शिक्षक जबाबदार असणार आहे. याची नोंद घ्यावी.
14. व्हिडिओमध्ये वापर करण्यात येणारी इमेज अथवा मजकूर हा कॉपीराईट मुक्त (Creative Commons) असण्याबाबत दक्षता घेण्यात यावी. कॉपीराईटची लायसन्सच्या सर्व मार्गदर्शक सूचनांची काळजी घ्यावी. याबाबत काही आक्षेप आल्यास संबंधित स्पर्धक जबाबदार असतील.
15. स्टॉक शॉटस किंवा कोणतेही कॉपीराइट केलेले ग्राफिक्स/इमेज संकलित करुन तयार केलेले व्हिडिओ स्पर्धेसाठी पात्र नसतील.
16. एका स्पर्धकाने फक्त एकच व्हिडिओ व त्याची Link नोंदणी फॉर्ममध्ये ईमेलव्दारे भरुन पाठवावी. तसेच ईमेल मधीलही मजकूरात पेस्ट करुन पाठवावी.

**हा एक अभिनव उपक्रम असून विदयार्थ्यांसाठी अधिक उपयुक्त आहे. तरी उपरोक्त सुचना विचारात घेवून व्हिडिओ तयार करुन तो दिनांक 26 डिसेंबर,2025 पर्यन्त आपल्या Youtube चॅनेलवर अपलोड करावा. अपलोड करताना Visibility - Private अशी Set करावी. Public किंवा Unlisted अशी Set करु नये. तसेच Set Visibility मध्ये Publish now हाच पर्याय ठेवावा. Publish करण्याची अन्य Date किंवा Time Set करु नये. अपलोड केलेल्या Video ची Link कॉपी करुन नोंदणी फॉर्ममध्ये Paste करुन दि.26/12/2025 पर्यन्त divkopvideo25@gmail.com यावर पाठवावी. सोबत स्पर्धकाचे नाव, पत्ता, विषय, मोबाईलनंबर ईमेलमध्ये नमूद करावे. स्पर्धे अगोदर प्रसिध्द झालेला Video स्पर्धेसाठी ग्राहय मानला जाणार नाही. Video मध्ये विभागीय मंडळाचा लोगो वापरु नये. तथापि बोर्ड परीक्षेचा राजमार्ग सूत्रबध्द नियोजनातून यशाकडे हा मजकूर असावा.**

**Youtube वर video अपलोड करताना Add details मध्ये पुढीलप्रमाणे माहिती असावी.**

| |
|---|
| Add details : SSC/HSC, SUB ____________________, YEAR -2026 **परीक्षेसाठी मार्गदर्शक व्हिडिओ असे संक्षिप्त वर्णन नमूद करावे.**<br>**उदा. दहावी परीक्षेतील इंग्रजी विषयासाठी मार्गदर्शक व्हिडिओ अपलोड करत असाल तर "SSC- ENGLISH - 2026 परीक्षेसाठी मार्गदर्शक व्हिडिओ" असे नमूद करावे.** |

**उत्कृष्ट व्हिडीओ निवडीचे निकष :**

- व्हिडीओ निर्मितीसाठी आवश्यक आशय-मजकूर आदर्श असावा.
- व्हिडीओमधील मजकूर, चित्रे, रंगसंगती अचूक व योग्य असावीत.
- शिक्षकांनी स्वतं: केलेले व्हिडिओ चित्रीकरण, सादरीकरण, एडिटिंग इत्यादी बाबींना महत्व असेल.
- आवाजात सुस्पष्टता असावी. आवाजाची/बोलण्याची गती योग्य प्रमाणात असावी. योग्य रंगसंगती वापरलेली असावी. आवाज आरोह-अवरोह युक्त असावा. बॅकग्राउंड नॉईज नसावा. जर बॅकग्राउंड म्युझिक घेणार असाल तर ते कमी आवाजात असावे. बॅकग्राउंड म्युझिक व आवाज हे स्लाईडच्या आशयाशी संबंधित असावे.

**गुणदानाचे निकष :**

1. **आशय/मजकूर** ---------------------------------------- **50 गुण**
2. **तंत्रज्ञानाचा वापर** -------------------------------------- **20 गुण**
3. **सादरीकरण कौशल्य** ----------------------------------- **20 गुण**
4. **एकंदरीत प्रभाव** ---------------------------------------- **10 गुण**

**एकूण** ---------------------------------------------------- **100 गुण**

**व्हिडिओ निर्मितीसाठी महत्वाच्या तांत्रिक बाबी :-**

- **व्हिडिओमधील संपूर्ण मांडणी स्वत:ची असावी.**
- **व्हिडिओशुट करण्यासाठी मोबाइल कॅमेराचा वापर करणार असाल तर त्यामध्ये अधिक स्पष्टता येण्यासाठी Open Camera या Application चा वापर करु शकता. शुटींग करताना मोबाईल Vertical न ठेवता आडव्या पध्दतीने पकडलेला असावा.**
- **व्हिडिओशुट करत असताना ॲडिओसाठी कॉलर माईकचा वापर करावा.**
- **व्हिडिओमध्ये आवश्यक असल्यास ॲनिमेशन व्हिडिओ किंवा चित्राचा वापर करता येईल.**
- **व्हिडिओमध्ये आवश्यकतेनुसार AI Images किंवा व्हिडिओचा वापर करता येईल.**
- **AI व्हिडिओ किंवा ॲनिमेशन व्हिडिओचा वापर करत असताना त्यातील ऑडिओचा वापर करता येणार नाही. फक्त व्हिडिओचा वापर करता येईल.**
- **व्हिडिओला Background Music चा वापर करत असताना Youtube Music किंवा Copywright free Music चा वापर करावा.**

सादर केलेल्या व्हिडिओंचे परीक्षण करुन उत्कृष्ट व्हिडिओ सादर करणाऱ्या शिक्षकांना मंडळामार्फत प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देवून गौरवांकीत करण्यात येईल. मंडळाकडून उत्कृष्ट विषयनिहाय व्हिडिओ जानेवारी महिन्यात मंडळाच्या संकेतस्थळावरुन, युटयूबवरुन प्रसिध्द केले जातील.

तरी उपरोक्त माहिती आपल्या माध्यमिक शाळेतील/ कनिष्ठ महाविदयालयातील सर्व शिक्षकांचे निदर्शनास आणून जास्तीतजास्त शिक्षकांना व्हिडिओ निर्मिती करुन स्पर्धेत सहभागी होवून विदयार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी प्रयत्न करावेत.

**( मा.विभागीय अध्यक्ष यांचे मान्यतेने )**

**(पुनिता गुरव)**
विभागीय सचिव,
**कोकण विभागीय मंडळ, रत्नागिरी**

**(सुभाष रा.चौगुले)**
विभागीय सचिव,
**कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर**

**प्रत माहिती व उचित कार्यवाहीसाठी:**

1. शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर
2. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सातारा/सांगली/कोल्हापूर/रत्नागिरी/सिंधुदुर्ग

टीप : ***प्रथम क्रमांक प्राप्त व्हिडिओ मंडळाकडून लोगोसह प्रसिध्द केले जातील. तथापि स्पर्धेतील इतर व्हिडिओबाबत विभागीय मंडळाची जबाबदारी असणार नाही. इतर Videos स्पर्धेकांना आपल्या स्तरावर प्रसिध्द करावयाचे असतील तर त्याबाबत आवश्यक ती दक्षता (मजकूर / आशय ) घेण्याची जबाबदारी संबंधित स्पर्धेकाची राहील.***

***स्पर्धेसाठी श्री.गजानन उकिर्डे, सहाय्यक सचिव, कोल्हापूर/कोकण विभागीय मंडळ यांची समन्वयक अधिकारी (नोडल ऑफिसर) म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे. संपर्कासाठी कार्यालयीन दूरध्वनी क्रमांक : 0231 2696101,102,103***

## व्हिडिओ मध्ये सुरुवातीला समाविष्ट करायचा मजकूर
## ( टेम्प्लेट)

बोर्ड परीक्षेचा राजमार्ग
सूत्रबध्द नियोजनातून यशाकडे

***व्हिडिओ निर्मिती स्पर्धा : 2025-26***

**उत्तरपत्रिकेचे अचूक लेखन**

**विषय** : --------------------------

**स्पर्धकाचे नाव** : ---------------------------------------------------------------------------------------

**माध्यमिक/कनिष्ठ महाविदयालयाचे नाव** : ------------------------------------------------------------

# नोंदणी अर्ज
## कोल्हापूर/कोकण विभागीय मंडळ व्हिडिओ निर्मिती स्पर्धा - 2025-2026

दिनांक : / /2025

1. स्पर्धकाचे नाव : ----------------------------------------------------------------------------------------------------------
----------------------------------------------------------------------------------------------------------

2. कनिष्ठ महाविद्यालय/शाळेचे नाव व पत्ता : ---------------------------------------------------------------------------------
------------------------------ ---------------------------------------------------------------------------------------

3. Udise No. -------------------------------------------------------

4.मोबाईल क्रमांक : ---------------------------------------------------

5. ईमेल : -----------------------------------------------------------------------------------

6. अध्यापन विषय : ------------------------------------------------------------------------------------------------------

7. व्हिडिओची लांबी : -------------------- मिनीटे

8. तांत्रिक सहाययकाचे नाव (असल्यास) : -------------------------------------------------------------------------------

9. अपलोड केलेल्या व्हिडिओची लिंक ( Link कॉपी करुन येथे पेस्ट करावी ): -----------------------------------------------
----------------------------------------------------------------------------------------------------------------------------

10. व्हिडिओ अपलोड केलेल्या Youtube चॅनेलचे नाव : ---------------------------------------------------------------

मी स्पर्धेच्या नियम व अटी पूर्णपणे वाचल्या असून त्या मला मान्य आहेत. सदरचा व्हिडिओ मी स्वत: तयार केला आहे. IPR (वैयक्तिक बौध्दिक संपदा), Copyright (वाङचौर्य) नाही. तसेच तो बनावट नाही. असल्यास स्पर्धेतून मी बाद होईन याची मला जाणीव आहे. स्पर्धेत निवड झालेल्या Video वर मी माझा कोणताही हक्क सांगणार नाही. त्यावर विभागीय मंडळ कोल्हापूर/कोकण यांचा हक्क राहिल याची मला जाणीव आहे.

**स्पर्धक स्वाक्षरी** :

प्रमाणित करण्यात येते की, उपरोक्त व्हिडिओ आमच्या माध्यमिक शाळेतील/कनिष्ठ महाविद्यालयातील नमूद शिक्षकाने स्वत: तयार केला असून त्यांची स्पर्धेसाठी शिफारस करण्यात येत आहे.

मुख्याध्यापक / प्रचार्य सही व शिक्का